# पश्चिम विदर्भातील धनगर समाजातील शैक्षणिक व आर्थिक जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव

**आर.एच. खंदारे**
*श्री. आर.जी. राठोड कला विज्ञान महाविद्यालय, मुर्तिजापूर*

**प्रा. डॉ. एच.यु. पेटकर**
*कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा*

## सारांश

*भारतीय समाज सर्व धर्माचे माहेरघर आहे भारतीय समाज विविधतेने नसलेला आहे भारतात विविध जाती धर्म पंथ हजार वर्षापासून एक रुपयाने राहत आहे त्यातच महाराष्ट्रातील आजपर्यंत विकसित दृष्ट्या मागासलेला प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भातील प्रदेशात पश्चिम भागात धनगर समाज अजूनही विकासापासून दूर आहे धनगर समाजाचा समावेश भटक्या जातीमध्ये केला जातो त्यांचा पशुपालन हा व्यवसाय असून त्यांची जीवन जगण्याची पद्धती वेगळीच आहे आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल जाणवतो पूर्वी धनगर समाज राज्यकर्ते जमात म्हणून ओळखली जात होती आज त्यांची स्थिती फारशी चांगली नाही त्यांच्या समग्र जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव जाणवतो.*

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झालेली आहे महाराष्ट्राची स्थापना कशी झाली याचा इतिहास बघितला तर भारताच्या इतिहासात विदर्भाचा उल्लेख आढळतो.

वरदातट शब्दानेच या प्रदेशाचे विदर्भ असे नाव प्रचलित आले याच प्रदेशात वऱ्हाड असाही शब्दप्रयोग केला जातो वऱ्हाड हा शब्द कसा प्रचलित आला याविषयी अब्दुल फजल यांनी आईन ए -अकबरी मध्ये वर्धा नदीचे नाव व तट यापासून आला आहे असे म्हणतो महाभारत पुराने इत्यादी उत्तरकालीन ग्रंथात विदर्भाचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो पयोष्णी पूर्णा,वरदा वर्धा, विना वैनगंगा इत्यादी पुण्य नद्यांचा व त्यांच्या तीरावरील पुण्य क्षेत्राचा उल्लेख उपरोक्त ग्रंथात येतो.विदर्भाचा ऐतिहासिक कालखंड 25000 वर्षाचा असून या काळात विदर्भावर राज्य करणाऱ्या प्रसिद्ध राजघराण्यांमध्ये मौर्य, सातवाहन, वाकाटक कलचुरी राष्ट्रकूट चालुक्य, यादव या सर्व राज्यांचा उल्लेख विदर्भ या नावाने होतो. याचाच अर्थ प्राचीन भारताच्या इतिहासात विदर्भ नावाचा उल्लेख होतो परंतु मध्य काळात बेरार च्या निर्मितीपासून वऱ्हाडची निर्मिती झाली आणि ते भारताला स्वातंत्र्य मुळे पर्यंत वऱ्हाड हा स्वतंत्र प्रांत अस्तित्वात होता त्यावेळी विदर्भ राज्याचा उदय झाला नव्हता. मध्ये काळात इसवी सन १३१८ ते १३४६ या काळात दिल्लीवर खिलजी व तगलक या घराण्याचे राज्य वराडात होते इसवी सन १३४६ मध्ये दिल्ली सुलतान महंमद तहलकाच्या काळात दक्षिणेकडे बंद झाले असताना त्याचा बंदोबस्त करण्यासाठी सुलतानाने हसन गंगू व हरिहर बुक यांना दक्षिणेत पाठवले हसन गंगुणे दक्षिणेतील बंडाळी मोडून गुलबर्गा येथे बहामनी राज्य व विजयनगर येथे हरिहर बुक या बंधूंनी हिंदू राज्याची निर्मिती केली. बहामनी सुलतानांनी पश्चिम विदर्भाला बेरार ही संज्ञा देऊन सरदारांमार्फत इसवी सन १३४६ ते १४८४ पर्यंत विदर्भावर राज्य केले पुढे पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात बहामनी राज्याचे सरदार स्वतंत्र होऊन बहामनी राज्याचे पाच तुकड्यांमध्ये रूपांतर झाले. पुढे विदर्भाचा समावेश महाराष्ट्र राज्यामध्ये करण्यात आला विदर्भाला सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या अटीवर विदर्भाचा समावेश महाराष्ट्रात करण्यात आला परंतु आजही विदर्भ इतर महाराष्ट्राच्या भागापेक्षा मागास आहे अशा मागासलेल्या भागात धनगर समाज मोठ्या प्रमाणात राहत असून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणणे गरजेचे असल्याने संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे.

आधुनिकीकरण म्हणजे विशिष्ट सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी गतिमान आणि सर्वपक्षी अशी सातत्याने चालू असलेली प्रक्रिया होय आधुनिकीकरण ही प्रक्रिया आहे हरित नव्हे ही प्रक्रिया केव्हा आणि समाजाच्या कोणत्या अवस्थेत थांबेल आणि परिणामी समाज कोणत्या अवस्थेत जाईल हे निश्चितपणे सांगता येत नाही अमेरिका इंग्लंड फ्रान्स जर्मनी जपान इत्यादी विकसित राष्ट्रांमध्ये प्रकर्षाने दिसून येणारी

अविकसित राष्ट्रांना आदर्श व ठरलेली प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरणाची प्रक्रिया होय.

### उद्दिष्टे

धनगर समाजाच्या शैक्षणिक स्थितीवर आधुनिकीकरणाचा प्रभाव जाणून घेणे

धनगर समाजाच्या आर्थिक स्थितीवर आधुनिकीकरणाचा प्रभाव जाणून घेणे

### संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी यादृष्छिक नमूना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला असुन या प्रकारातील साध्या यादृष्छिक पध्दतीमधील लॉटरी पध्दतीचा उपयोग करुन उत्तर दात्यांची निवड करण्यात आलेली आहे. ही निवड करतांना पश्चिम विदर्भातील ५ जिल्ह्यातील व प्रत्येक जिल्ह्यातील कुटुंब प्रमुखाचे एकक म्हणून निवड करण्यात आली असुन प्रत्येक जिल्ह्यातुन ८० म्हणजे ५ जिल्ह्यातील ४०० निवेदकांची निवड करण्यात आलेली आहे.

सुरुवातीपासून मागास प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भात त्यातल्या त्यात पश्चिम विदर्भात धनगर समाज मोठ्या प्रमाणात राहत असून धनगर समाजाची आपली एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे आपल्या संस्कृती विषयी धनगर समाजाला अभिमान आहे धनगर समाजातील सर्व सदस्य आपल्या संस्कृतीचे जतन करताना दिसून येतात धनगर समाजात विविध सण उत्सव साजरे करतात प्रामुख्याने कुलदैवताची जत्रा उत्सव महत्त्वाचा असून धनगर समाजातील प्रत्येक व्यक्ती त्यात सहभागी होत असतात यामध्ये बिरोबा खंडोबा मायाक्का अशा विविध कुलदैवतांचे सण उत्सव साजरे केले जातात आपापल्या भागातील आपापल्या कुलदैवतांची पूजा चर्चा केली जाते उत्सव धनगर लोक मोठ्या उत्साहाने साजरे करतात धनगर समाजात याव्यतिरिक्त हिंदू धर्मातील सण उत्सव देखील साजरे केले जातात त्यामध्ये दसरा हा महत्त्वाचा सण धनगर समाज मोठ्या प्रमाणात उत्साहाने साजरा करतो शस्त्राची पूजा करतात तसेच पोळा दिवाळी अक्षय तृतीया नागपंचमी शिमगा हे सण देखील धनगर समाज मोठ्या उत्साहाने साजरे करतो धनगर समाजात विठ्ठल बिरदेव खंडोबा धुळदेव या देवांच्या यात्रा भरवल्या जातात आपला रक्षण करता देव असल्यामुळे शेळ्या-मेंढ्यांचा बळी देखील दिला जातो आपले कुटुंब सुखी राहावे सुख वैभव लाभावे शेळ्या मंडळांना रोगराई येऊ नये यासाठी देवाला नवस बोलतात भंडारा लावून देवाचा जागर करतात धनगर समाजात घराचा कुळाचार म्हणून जागरण गोंधळाचा कार्यक्रम होत असतो यासाठी वाघ्या मुरळी व गोंधळ घालणारी मंडळी पारंपारिक पद्धतीने समाजाला अभिप्रेत असणारी गीते म्हणतात धनगर समाजात पालखी आणणे किंवा देव बसवणे अशा परंपरा असून देवघरी बसल्यावर दोन वेळची पूजा देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना पुरणपोळीचे जेवण व पालखीचा येण्याजाण्याचा खर्च भक्ताला करावा लागतो रात्रीच्या वेळी सुंबरान हा धनगरी ओवी गीतांचा कार्यक्रम केला जातो त्यातून देवाच्या पराक्रमाच्या लिहिला गायल्या जातात.

### शैक्षणिक स्थिती

धनगर समाजाचा पारंपारिक व्यवसाय पशुपालन हा आहे परंतु आज त्यांचा पशुपालन हा व्यवसाय कमी झालेला दिसून येतो पूर्वीपासूनच भारतीय समाजात पशुपालनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे पूर्वी व आजही ज्याच्याकडे जास्त पशु तो श्रीमंत किंवा त्याचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ असे समजले जात होते परंतु आज पशुपालनाला कमी लेखला जात आहे त्यातल्या त्यात पशुपालनासाठी आज नष्ट झाली असून त्यामुळे देखील धनगरांचे पशुपालन हा व्यवसाय कमी झालेला दिसून येतो त्यातल्या त्यात धनगर समाज सातत्याने भटकंती करत असल्यामुळे शिक्षणापासून सुरुवातीपासून ते वंचित राहिले आहेत परंतु पशुपालन व्यवसाय कमी झाल्यामुळे आज ते खेडोपाडी स्थायिक झालेले दिसून येतात पशुपालन सोडून आज काही धनगर समाज शेती करताना दिसून येतो तर काही हात मजुरी किंवा शेतमजुरी करून आपली उपजीविका भागवतांना दिसून येतात हे जरी खरे असले तरी देखील थोड्याफार प्रमाणात स्थायिक झाल्यामुळे त्यांचे शिक्षणाकडे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढलेले दिसून येतेशिक्षणामुळेच व्यक्तिगत व सामाजिक विकास शक्य आहे हे जाणल्यानंतर धनगर समाजात आधुनिकीकरणामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे पश्चिम विदर्भातील धनगर समाजाचे अध्ययन केले असता धनगर समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे धनगर समाजात उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण 26.25 प्रतिशत दिसून आले आहे त्याचबरोबर पदवीधर असणाऱ्या चे प्रमाण 18 प्रतिशत इतके आढळून आले आहे आधुनिकीकरणामुळे धनगर समाजात पदवीत्तर पदवी घेणाऱ्यांचे प्रमाण

18 प्रतिशत इथपर्यंत गेले आहे आधुनिकीकरणामुळे धनगर समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढत असले हे जरी खरे असले तरी देखील अजून पर्यंत पाहिजे तसे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले नाही. आपला परंपरागत पशुपालन व्यवसाय आपल्या मुलांनी सुरू ठेवा म्हणून त्यांना जास्त शिकवले जात नाही जे लोक पशुपालन करतात अशा मुलांना नातेवाईक लग्नासाठी मुली देखील देत नाही कारण पशुपालन करणाऱ्याला मुली दिल्यास आपल्या मुलीला देखील रानावनात भटकावे लागेल असा त्यांचा समज असतो आणि म्हणून बरेच कुटुंब आपल्या मुलांना जास्त शिक्षण देत नाही त्यांना पशुपालनासाठी तयार केले जाते म्हणूनच धनगर समाजात शिक्षणाचे प्रमाण पाहिजे त्या प्रमाणात वाढलेले दिसून येत नाही.

## आर्थिक स्थिती

धनगर समाजाचा पूर्वीपासूनच पशुपालन हा पारंपारिक व्यवसाय राहिलेला आहे जागतिक स्तरावर पशुपालनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहेत कारण पशुपालनातून मिळणारे उत्पन्न मोठ्या प्रमाणात मिळत असते परंतु महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भात धनगरांची स्थिती आर्थिक दृष्ट्या फारशी चांगली नाही तसे पाहिले तर भौगोलिक दृष्ट्या पश्चिम विदर्भ हा पर्जन्यमानाच्या दृष्टिकोनातून सरासरी आहे जास्त पाऊस पडत नाही त्यामुळे शेळ्या-मेंढ्यांना सराईसाठी कुरणेदेखील उपलब्ध नाहीत किंवा शेतकरी देखील आपल्या शेतामध्ये सराईसाठी मनाई करतात अनेक लोकांनी शेती हा व्यवसाय स्वीकारला असून पश्चिम विदर्भात पर्जन्यमान कमी पडत असल्यामुळे शेतीतून फारसे उत्पन्न मिळत नाही त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्ती नेहमीच येत असल्यामुळे झालेले पीक देखील हाती लागत नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली दिसून येते म्हणून 25.75 प्रतिशत लोकांना कर्ज घ्यावे लागते त्याचबरोबर 27.25 प्रतिशत लोकांना उसने पैसे घ्यावे लागतात यावरून त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही असे दिसून येते जे लोक पशुपालन करतात त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे दिसून येते अर्थात याचे मुख्य कारण म्हणजे आज मांसाहार करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून एक बोकड आठ ते दहा हजाराला जातो अर्थात दर तीन महिन्यानंतर अशा प्रकारची पैशांची उलाढाल होत असल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होण्यास मदत होते परंतु जे लोक शेती व शेतमजूर म्हणून आपले उपजीविका भागवतात त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही.

## निष्कर्ष

धनगर समाजातील लोक पूर्वीसारखे पारंपरिक पद्धतीने सण साजरे करताना दिसत नाही धनगर समाज काही अंधश्रद्धांपासून दूर गेला असल्याचे दिसून येते धनगर समाज खंडोबा बिरोबाच्या नावाने यात्रा काढतो धनगर समाजाची आर्थिक परिस्थिती मागासलेली दिसते पण शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे धनगर समाज यामध्ये पूर्वी उप जातीला महत्त्व होते आता मात्र उपजाती एका झेंड्याखाली आणण्यासाठी धनगर समाज संघटित होत आहे धनगर समाजातील मुला मुलींना शिक्षण मिळू लागले आहे त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढलेला आहे त्यांच्या राजकीय हक्कासाठी ते सक्रिय होत आहेत.

## संदर्भ ग्रंथ


1. बोधनकर सुधिर, समाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन नागपूर
2. गावटे, धनगरांचे लोकसाहीत्यातील समाज दर्शन, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.
3. अलोणी नारायण केशव, लग्नविधी व सोहळे, पुणेः वरदा बुक्स, दुसरी आवृत्ती
4. आगलावे प्रदीप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपुर: श्री साईनाथ प्रकाशन
5. आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, कोल्हापूर: समन्वय प्रकाशन, आवृत्ती डिसेंबर,
6. कदम नागनाथ धो, 'महाराष्ट्रातील भटका समाजः संस्कृती व साहित्य, पुणेः प्रतिमा प्रकाशन प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण
7. प्रा. डॉ. निलेश देशमुख -विदर्भ नावाच्या निर्मितीच्या घटनाक्रमाचा इतिहास रिसर्च पेपर नोव्हेंबर 2018
8. शिवाजी देशमुख 2009 आदिवासी लोकजीवन
9. रामनाथ चव्हाण भटक्या जमातीची जात पंचायत खंड दोन 2004